श्री. अन्सार महमंदकासम पटेल, सहाय्यक नगर रचनाकार, उप संचालक, नगर रचना, मुंबई प्रदेश, मूल्यांकन, मुंबई यांचा सक्तीचा प्रतिक्षा कालावधी "कर्तव्य कालावधी" म्हणून मंजूर करण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग,
शासन निर्णय क्रमांक :-सप्रका-१४१५/१८०४/प्र.क्र.३४८/नवि-२७,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
चौथा मजला, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- १६ जानेवारी, २०१६.

वाचा :- १. संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयीन आदेश क्र.आस्था/रस-सनर-बदल्या/प्रशा-१/३४११, दि.२९.०५.२०१५.
२. श्री. अ. म. पटेल, सहाय्यक नगर रचनाकार यांचा अर्ज, दि.२४.०८.२०१५.
३. संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयीन आदेश क्र.आस्था/मुदतपूर्व बदल्या-सनर/प्रशा-१/५८९१, दि.२३.०९.२०१५.
४. संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.आस्था/अमप-सनर/प्र.का./प्रशा-१/७२८६, दि.२६.११.२०१५.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील प्रकरण दोन नियम क्र.३ (१), ४ (१) (२), (४) मधील तरतूदीनुसार सहाय्यक नगर रचनाकार संवर्गातील अधिकाऱ्यांच्या सन-२०१५ च्या नियतकालीक बदल्या करतांना संचालक, नगर रचना, पुणे यांनी त्यांच्या **संदर्भ-१** येथील दि.२९.०५.२०१५ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये श्री. अन्सार महमंदकासम पटेल, सहाय्यक नगर रचनाकार, रत्नागिरी शाखा, रत्नागिरी यांची मिरा-भाईंदर महानगरपालिका येथे प्रथम एक वर्षासाठी प्रतिनियुक्तीने पदस्थापना केली होती.

०२. श्री. अ. म. पटेल, सहाय्यक नगर रचनाकार हे दि.२९.०५.२०१५ (म.नं.) रोजी रत्नागिरी शाखा, रत्नागिरी कार्यालयातून कार्यमुक्त होऊन दि.३०.०५.२०१५ (म.पू.) रोजी मिरा-भाईंदर महानगरपालिका येथे रुजू होण्याकरिता गेले असता, त्यांना मिरा-भाईंदर महानगरपालिका येथे रुजू करुन घेण्यात आले नव्हते. त्यामुळे श्री. अ. म. पटेल, सहाय्यक नगर रचनाकार यांनी त्यांच्या **संदर्भ-२** येथील दि.२४.०८.२०१५ च्या अर्जान्वये त्यांना अन्यत्र पदस्थापना देण्याबाबत संचालक, नगर रचना, पुणे यांना विनंती केली होती. त्यास अनुसरुन संचालक, नगर रचना, पुणे यांनी सहाय्यक नगर रचनाकार संवर्गातील अधिकाऱ्यांच्या मध्यावधी बदल्या करण्यासंबंधात वरिष्ठ सक्षम प्राधिकारी या नात्याने प्रशासकीय विभागाची मान्यता घेऊन त्यांच्या **संदर्भ-३** येथील दि.२३.०९.२०१५ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये श्री. अ. म. पटेल, सहाय्यक नगर रचनाकार यांची उप संचालक, नगर रचना, मुंबई प्रदेश, मूल्यांकन, मुंबई या कार्यालयात बदलीने पदस्थापना केलेली आहे. श्री. अ. म. पटेल, सहाय्यक नगर रचनाकार हे उक्त कार्यालयात दि.२४.०९.२०१५ (म.पू.) रोजी रुजू झालेले आहेत.

०३. अशाप्रकारे, श्री. अ. म. पटेल, सहाय्यक नगर रचनाकार हे त्यांची रत्नागिरी शाखा कार्यालयातून बदली केल्यापासून म्हणजे दि.३०.०५.२०१५ (म.पू.) पासून ते त्यांना उप संचालक, नगर रचना, मुंबई प्रदेश, मूल्यांकन, मुंबई या कार्यालयात बदलीने पदस्थापना देण्यात येईपर्यंत म्हणजे दि.२३.०९.२०१५ (म.नं.) पर्यंत पदस्थापनेकरिता सक्तीने प्रतिक्षेत होते. याकरिता ते व्यक्तीश: जबाबदार नव्हते. त्यामुळे श्री. अ. म. पटेल,

सहाय्यक नगर रचनाकार यांचा दि.३०.०५.२०१५ (म.पू.) ते दि.२३.०९.२०१५ (म.नं) हा सक्तीचा प्रतिक्षा कालावधी "कर्तव्य कालावधी" म्हणून मंजूर करणे आवश्यक आहे. संचालक, नगर रचना, पुणे यांनी त्यांच्या **संदर्भ-४** येथील दि.२६.११.२०१५ रोजीच्या पत्रान्वये श्री. अ. म. पटेल, सहाय्यक नगर रचनाकार यांचा सक्तीचा प्रतिक्षा कालावधी "कर्तव्य कालावधी" म्हणून मंजूर करण्याबाबत प्रस्ताव शासन मान्यतेस्तव सादर केलेला आहे.

०४. सबब, श्री. अ. म. पटेल, सहाय्यक नगर रचनाकार, उप संचालक, नगर रचना, मुंबई प्रदेश, मूल्यांकन, मुंबई यांचा दि.३०.०५.२०१५ (म.पू.) ते दि.२३.०९.२०१५ (म.नं.) हा सक्तीचा प्रतिक्षा कालावधी "कर्तव्य कालावधी" म्हणून मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत पुढीलप्रमाणे शासन आदेश देण्यात येत आहेत :-

शासन निर्णय :-

श्री. अन्सार महमंदकासम पटेल, सहाय्यक नगर रचनाकार, उप संचालक, नगर रचना, मुंबई प्रदेश, मूल्यांकन, मुंबई यांना दि.३०.०५.२०१५ (म.पू.) ते दि.२३.०९.२०१५ (म.नं.) या कालावधीत प्रशासकीय कारणास्तव पदस्थापनेकरिता सक्तीने प्रतिक्षेत राहावे लागले होते, याकरिता ते व्यक्तीशः जबाबदार नव्हते.

०२. श्री. अ. म. पटेल, सहाय्यक नगर रचनाकार, उप संचालक, नगर रचना, मुंबई प्रदेश, मूल्यांकन, मुंबई यांचा दि.३०.०५.२०१५ (म.पू.) ते दि.२३.०९.२०१५ (म.नं.) हा सक्तीचा प्रतिक्षा कालावधी महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, १९८१ मधील नियम ९ (१४) (फ) (शर्त क्रमांक ०१) अन्वये "कर्तव्य कालावधी" म्हणून मंजूर करण्यात येत आहे.

०३. श्री. अ. म. पटेल, सहाय्यक नगर रचनाकार, उप संचालक, नगर रचना, मुंबई प्रदेश, मूल्यांकन, मुंबई यांना दि.३०.०५.२०१५ (म.पू.) ते दि.२३.०९.२०१५ (म.नं.) या कालावधीतील अनुज्ञेय वेतन व भत्ते अदा करण्याबाबत संबंधीत आहरण व संवितरण अधिकारी यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी.

०४. सदरचे आदेश वित्त विभाग, शासन निर्णय क्र.सेनिवे-१००१/१३०/सेवा-४, दि.०२ जून, २००३ अन्वये नियुक्ती प्राधिकारी यांना प्रत्यायोजित करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

०५. सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक **२०१६०११६१०२६०४८१२५** असा आहे. सदर शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने प्रमाणित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशांनुसार व नांवाने,

Dilip Sitaram Anerao

Digitally signed by Dilip Sitaram Anerao
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Desk Officer, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=26293749901b04ac59c3d853c2fdc32df608 3d811902b3e94b40b924fa028887, cn=Dilip Sitaram Anerao
Date: 2016.01.20 16:55:37 +05'30'

(दि. सि. अणेराव)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई / महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.

२. महालेखापाल (लेखा परिक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई / महालेखापाल (लेखा परिक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.

३. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई / नागपूर.

४. संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे. (३-प्रती)

५. सह संचालक, नगर रचना, कोंकण विभाग, कोंकण भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई.

६. उप संचालक, नगर रचना, मुंबई प्रदेश, मूल्यांकन, मुंबई.

७. अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा अधिकारी यांचे कार्यालय, मुंबई.

८. श्री. अन्सार महमंदकासम पटेल, सहाय्यक नगर रचनाकार, उप संचालक, नगर रचना, मुंबई प्रदेश, मूल्यांकन, मुंबई यांचे कार्यालय, मुंबई यांना **(संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत)**

९. निवडसंग्रह / नवि-२७.